# मुंबई विद्यापीठ
# आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग
चर्चगेट , मुंबई -२०

# " उडान- विस्तार कार्याची गरूडझेप
## " वार्षिक विस्तार कार्य महोत्सव २०२१-२०२२

आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाद्वारे दरवर्षी जानेवारी-फेब्रुवारी महिन्यात मुंबई , ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये विकेंद्रित पद्धतीने " उडान- विस्तार कार्याची गरूडझेप " या वार्षिक विस्तार कार्य महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. मुंबई विद्यापीठाच्या अखत्यारीत विविध महाविद्यालयातील विस्तार कार्याचे विद्यार्थी एकत्र येऊन या विस्तार कार्य महोत्सवा त सहभाग घेतात . अन्नपूर्णा योजना ( APY), करिअर प्रकल्प ( CP), उद्योग अभिमुखता प्रकल्प (IOP), नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओपन स्कूलिंग (NIOS), लोकसंख्या शिक्षण क्लब (PEC) आणि महिला स्थितीचे सर्वेक्षण (SWS) हे सहा विस्तार कार्य प्रकल्प आहेत.

यावर्षी, आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग हा महोत्सव ऑनलाइन पद्धतीने आयोजित कर त आहे आणि सर्व विस्तार कार्य महाविद्यालयांना या महोत्सवात सहभागी होण्यासाठी आमंत्रित कर त आहे. सर्वोत्कृष्ट कामगिरी आणि सर्वोत्कृष्ट प्रदर्शनांना तज्ञ पॅनेलच्या शिफारशींवर आधारित ‘ उडान’ प्रमाणप त्रांद्वारे सन्मानित करण्यात येईल. तसेच आयोजक महाविद्यालय, क्षेत्र समन्वयक, विस्तार शिक्षक आणि अँकर यांचाही विशेष योगदान प्रमाणपत्र देण्यात येईल.

**उडान महोत्सवाची उद्दिष्टे:-**

- मुंबई विद्यापीठाने केलेल्या शैक्षणिक विस्तार कार्याबाबत संलग्न महाविद्यालयांमार्फत जनमानसात जनजागृती करणे.
- महाविद्यालयीन विद्यार्थ्यांवर लक्ष केंद्रित करून विस्तार कार्य प्रकल्पांवर आधारित विविध स्पर्धांद्वारे सामाजिक समस्यांबद्दल जागरूकता निर्माण करणे.
- व्यवस्थापन, शिक्षण आणि उद्योजकता या क्षेत्रातील नाविन्यपूर्ण बाबींशी सहसंबंध साधून विद्यार्थ्यांना त्यांची कौशल्ये वाढवण्याची संधी देणे.

**स्पर्धा**

1. **शॉर्ट फिल्म / व्हिडिओ मेकिंग** (प्रत्येक महाविद्यालयातून एक व्हिडिओ)
2. **पोस्टर स्पर्धा** (प्रत्येक महाविद्यालयातून एक पोस्टर)
3. **पोवाडा गायन** (प्रत्येक महाविद्यालयातून एक प्रवेश)
4. **वक्तृत्व – Elocution** (प्रत्येक महाविद्यालयातून एक विद्यार्थी)
5. **सर्जनशील लेखन – Creative Writing** (प्रत्येक महाविद्यालयातून एक विद्यार्थी)

स्पर्धांसाठीच्या तपशीलवार सूचना खालीलप्रमाणे आहेत:

## 1. शॉर्ट फिल्म / व्हिडिओ मेकिंग (चित्रफीत निर्मिती) (ऑनलाइन प्रणालीद्वारा)

- **फक्त नोंदणीकृत DLLE विद्यार्थीच सहभागी होऊ शकतात.**
- महाविद्यालये त्यांच्याकडून घेतलेल्या विस्तार कार्य प्रकल्पांपैकी **फक्त एका** सामाजिक समस्यांवर आधारित **शॉर्ट फिल्म / व्हिडिओ मेकिंग (चित्रफीत निर्मिती)** निर्मित करतील.
- साहित्यिक चोरी किंवा कॉपीराइटशी संबंधित कोणत्याही प्रकारच्या कायदेशीर समस्यांची संपूर्ण जबाबदारी सादरीकरण करणाऱ्या महाविद्यालयाची असेल. यासाठी आयोजक जबाबदार राहणार नाहीत.
- कोणत्याही प्रकाशित व्हिडिओची किंवा शॉर्ट फिल्म/व्हिडिओमधील सामग्रीची हुबेहूब प्रत अथवा नक्कल स्पर्धेतील प्रवेशास प्रतिबंधित करेल. सहभागींना सूचित करण्यात येत आहे की त्यांनी त्यांच्या स्वतःच्या सर्जनशीलतेचा वापर करावा आणि व्हिडिओ (**चित्रफीत**) केवळ शैक्षणिक हेतूसाठी बनवावा.
- विस्तार कार्यात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना शॉर्ट फिल्म/व्हिडिओमध्ये सर्व प्रमुख/ दुय्यम भूमिका पार पाडाव्या लागतील.जास्तीत जास्त १० विद्यार्थी VIDEO (**चित्रफीत**) मध्ये सहभाग घेऊ शकतात.
- विद्यार्थ्यांनी दिग्दर्शन, पटकथा लेखन, संवाद लेखन, गीत, संगीत दिग्दर्शन, कॅमेरा शुटिंग, प्रकाश, संपादन इत्यादी बाबी करणे अपेक्षित आहे.
- सामग्रीची मौलिकता (कथेची गुणवत्ता आणि स्क्रिप्ट) , निर्मिती (कॅमेरा कार्य , प्रकाश आणि शॉट रचना) , पोस्ट-प्रोडक्शन (संपादन, संक्रमण, सातत्य आणि प्रवाह) , प्रतिमा (फोकस, रंग, आणि प्रकाश) आणि ध्वनी गुणवत्ता (स्पष्टता, ध्वनी पातळीची सुसंगतता आणि आवाजाचा प्रभाव) या आधारे परीक्षण केले जाईल.
- चित्रफितीतील आशय/संवाद/गीत/संगीत याने कोणत्याही व्यक्ती, समाज, धर्म इत्यादींच्या भावना दुखावू नयेत. कोणतीही अडचण आल्यास सर्वस्वी जबाबदारी सादारीकरण करणाऱ्या संबधित महाविद्यालयाची असेल. त्यासाठी आयोजक जबाबदार राहणार नाहीत.
- चित्रफितीच्या सुरुवातीला आणि शेवटी विभागाने दिलेले संकेतांक क्रमांक (कोड नंबर) वापरा.
- व्हिडिओमध्ये कॉलेजचे / विद्यार्थ्यांचे नाव किंवा कॉलेजची / विद्यार्थ्यांची ओळख कोणत्याही स्वरूपात उघड करण्यास सक्त मनाई आहे.
- प्रत्येक कॉलेज जास्तीत जास्त ०५ (पाच ) मिनिटांचा व्हिडिओ बनवावा.
- व्हिडिओमध्ये संगीत कोणत्याही स्वरूपात प्ले / रेकॉर्ड केले जाऊ शकते (मग ते थेट किंवा रेकॉर्ड केलेले किंवा कोणत्याही योग्य वाद्यासह करा). कृपया संवाद वितरण करताना आवाजाची गुणवत्ता स्पष्ट ठेवा.
- बंदिस्त वातावरणात (वर्ग किंवा स्टुडिओ) कॅमेरासह क्लोज अप शैलीमध्ये व्हिडिओ रेकॉर्डिंगप्रशंसनिय राहील .
- पात्रांचे पोशाख परिधान करणे, व्हिडिओमध्ये मेकअप करणे आवश्यकतेनुसार केले जाऊ शकते परंतु अनिवार्य नाही. व्हिडिओचे गुणांकन (स्कोअरिंग) विस्तार कार्य प्रकल्पाशी सुसंगतता , मौलिकता, अभिनय कौशल्य/कार्यप्रदर्शन, सादरीकरण, एकूण प्रभाव आणि लघुपट/व्हिडिओ सादरीकरणाद्वारे दिलेला संदेश याच्या आधारे केले जाईल.
- अंतिम तारखेला किंवा त्यापूर्वी निर्णयासाठी शॉर्ट फिल्म/व्हिडिओ किंवा शॉर्ट फिल्म/व्हिडिओची लिंक विभागाकडे सबमिट करा, ज्याची माहिती कॉलेजांना आधीच दिली जाईल.
- कृपया शॉर्ट फिल्म / व्हिडिओ तयार करताना कोविड19 योग्य वर्तन मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करा.

2. पोस्टर स्पर्धा (ऑनलाइन प्रणालीद्वारा)

- **फक्त नोंदणीकृत DLLE विद्यार्थीच सहभागी होऊ शकतात.**
- 2021 - 2022 या शैक्षणिक वर्षासाठी घेतलेल्या कोणत्याही विस्तार कार्य प्रकल्पावर अथवा दिलेल्या विषयांवर **फक्त एक पोस्टर** तयार करावे
- कृपया स्पर्धेच्या नियोजित वेळेच्या 30 मिनिटे आधी स्पर्धेच्या लिंकवर सामील व्हा.
- शक्यतो कार्डपेपरवर पोस्टरचा आकार अंदाजे 28”×22” (इंच) असणे अपेक्षित.
- पोस्टर तयार करण्यासाठी कृपया योग्य सामग्री वापरा.
- निर्धारित/दिलेल्या वेळापत्रकात कॅमेरा चालू ठेवून पोस्टर तयार केले पाहिजे.
- स्पर्धेत सहभागी होण्यासाठी लिंक आयोजक महाविद्यालयाद्वारे प्रदान केली जाईल आणि सहभागींनी त्यांचा कॅमेरा अशा प्रकारे समायोजित करणे आवश्यक आहे की कार्यक्रम समन्वयक तुमचे रेखाचित्र पाहण्यास सक्षम असेल.
- कृपया पोस्टर बनवण्याची क्रिया सुरू करण्यापूर्वीकार्यक्रम समन्वयकासोबत कॅमेरा सेटिंगची खात्री करा.
- स्पर्धेच्या दिवशी विभागाकडून पोस्टरचा सांकेतिक क्रमांक (कोड नंबर) महाविद्यालयाच्या विस्तार शिक्षकांसोबत शेअर केला जाईल. सहभागींनी पोस्टर पेपरच्या वरच्या उजव्या कोपर्यात फॉन्टच्या सहज वाचता येण्याजोग्या आकारात ते लिहावे (फॉन्टची किमान 15 मिमी उंची.)
- पोस्टर बनवण्याचा कालावधी 02 (दोन) तासांचा आहे.
- पोस्टर सबमिशनसाठी तयार झाल्यावर , सहभागींनी ते कॅमेर्यासमोर धरून विभागामार्फत गट छायाचित्र काढले जाईल.
- फक्त मूळ पोस्टर सादर करावेत. कोणत्याही स्त्रोतावरून नक्कल केल्यास स्पर्धेसाठी अपात्र ठरवण्यात येईल.
- पोस्टरची सामग्री, सर्जनशीलता, रंगसंगती आणि पोस्टरद्वारे दिलेला संदेश याच्या आधारे स्पर्धेचे गुणांकन केले जाईल.
- स्पर्धेचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर स्पर्धकाने **30 मिनिटांच्या आत** पोस्टरचा स्पष्ट डिजिटल फोटो सादर करावा. निर्धारित वेळेनंतर सादर केलेल्या प्रवेशिका स्पर्धेसाठी विचारात घेतल्या जाणार नाहीत.
- कृपया पोस्टर तयार करताना कोविड 19 योग्य वर्तन मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करा.

3. पोवाडा गायन स्पर्धा: (ऑनलाइन प्रणालीद्वारा)

- **फक्त नोंदणीकृत DLLE विद्यार्थीच सहभागी होऊ शकतात.**
- सादरीकरण कालावधी 5 मिनिटे असेल. मुख्य गायक आणि कोरस असे एकूण 10 विद्यार्थी सहभागी होऊ शकतात.
- स्पर्धकांनी स्पर्धेच्या नियोजित वेळेच्या 30 मिनिटे आधी स्पर्धेच्या लिंकवर सहभागी व्हावे.
- कॅमेरा सेटिंग समायोजित करा आणि आवाज तपासणी करा. कामगिरी सुरू करण्यापूर्वी स्पर्धेच्या पर्यवेक्षकासह सर्व बाबी योग्य असल्याची खात्री करा.
- गायन सादरीकरण सुरू करण्यापूर्वी, कॉलेज कोड नंबर घोषित करा.

- स्पर्धक पोवाड्यासाठी (डफ, संबळ इ.) योग्य वाद्य वापरू शकतात . सादरीकरणादरम्यान आवाजाची गुणवत्ता स्पष्ट ठेवा.
- संगीतकारांनी त्यांची वाद्ये अगोदरच ट्यून करून ठेवावीत. त्यासाठी अतिरिक्त वेळ दिला जाणार नाही.
- सादरीकरणा दरम्यान इतर दस्तऐवज वापरास अनुमती नाही.
- स्पर्धेमध्ये महाविद्यालयाचे नाव उघड करणे किंवा कोणत्याही स्वरुपात स्वत:ची ओळख उघड करण्यास सक्त मनाई आहे.
- विस्तार प्रकल्पाशी संबंधित थीम , गायन कौशल्य/कार्यप्रदर्शन , सादरीकरण, एकूण प्रभाव आणि पोवाड्यातून दिलेला संदेश याच्या आधारे गायनाचे गुणांकन (स्कोअरिंग) केले जाईल.
- कृपया कोविड 19 योग्य वर्तन मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करा.

**वक्तृत्व स्पर्धा: (ऑनलाइन प्रणालीद्वारा)**

- **फक्त नोंदणीकृत DLLE विद्यार्थीच सहभागी होऊ शकतात.**
- वक्तृत्व स्पर्धेसाठी स्पर्धकाला ०५ मिनिटे दिली जातील. कालमर्यादेचे पालन करणे बंधनकारक आहे.
- वक्तृत्व स्पर्धेचा विषय या नियमावलीमध्ये आधीच घोषित केला आहे.
- स्पर्धक विभागाद्वारे प्रदान केलेल्या लिंकवर सहभागी होतील आणि कॅमेरा आणि माईक सेटिंग समायोजित करतील आणि स्पर्धा सुरू होण्यापूर्वी स्पर्धेच्या कार्यक्रम समन्वयकाकडे याची पुष्टी करतील.
- निवडलेल्या विषयावर भाषण सुरू करण्यापूर्वी सहभागी विद्यार्थी/ विद्यार्थिनीने कॉलेज कोड घोषित करावा.
- वक्तृत्व स्पर्धेदरम्यान इतर दस्तऐवज किंवा कोणत्याही डिजिटल स्वरूपातसामग्री वापरास अनुमती नाही.
- स्पर्धेमध्ये महाविद्यालयाचे नाव उघड करणे किंवा कोणत्याही स्वरुपात स्वत:ची ओळख उघड करण्यास सक्त मनाई आहे.
- स्पर्धेचे गुणांकन (स्कोअरिंग) माहिती वितरणाची शैली आणि भाषणाद्वारे दिले जाणारे संदेश यावर आधारित केले जाईल.
- स्पर्धकाने स्पर्धेच्या नियोजित वेळेच्या 30 मिनिटे आधी स्पर्धेच्या लिंकवर सामील व्हावे.
- कृपया कोविड 19 योग्य वर्तन मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करा.

५. **सर्जनशील लेखन: Creative Writing (ऑनलाइन प्रनालीद्वारा)**

- **फक्त नोंदणीकृत DLLE विद्यार्थीच सहभागी होऊ शकतात.**
- स्पर्धकाने स्पर्धेच्या नियोजित वेळेच्या 30 मिनिटे आधी विभागाद्वारे प्रदान केलेल्या लिंकवर सहभागी व्हावे.
- कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी कृपया कार्यक्रम समन्वयकासोबत कॅमेरा सेटिंगची पुष्टी करा.

- सहभागी महाविद्यालयाचा सांकेतिक क्रमांक स्पर्धेच्या दिवशी विभागाकडून दिला जाईल. सहभागींनी ते सहज वाचता येण्याजोग्या फॉन्ट आकारात A4 आकाराच्या लेखन कागदाच्या वरच्या उजव्या कोपर्यातत लिहावे अशी विनंती आहे. (फॉन्टची किमान 15 मिमी उंची.)
- सहभागी स्पर्धकांना आयोजकांद्वारे सामाजिक जागृतीवर आधारित चित्र/दृश्य किंवा छोटी व्हिडिओ क्लिप दाखवली जाईल.
- स्पर्धकांचे सर्जनशील लेखन दाखवलेल्या चित्र/दृश्य/व्हिडिओ क्लिपवर आधारित असावे.
- सहभागी स्पर्धकांनी किमान 300 शब्दांची मर्यादा आणि 30 मिनिटांच्या कालावधीचे पालन केले पाहिजे.
- सर्जनशील लेखन स्पर्धेदरम्यान इतर दस्तऐवज किंवा कोणत्याही डिजिटल स्वरूपातील साधनांच्या वापरास अनुमती नाही.
- सहभागी स्पर्धकांनी लेखन क्रिया पूर्ण केल्यावर आणि सबमिशनसाठी तयार झाल्यावर , त्याने/तिने आपले लेखन विभागाद्वारे घेतल्या जाणाऱ्या गट छायाचित्रासाठी कॅमेऱ्यासमोर धरले पाहिजे.
- स्पर्धेच्या शेवटी, स्पर्धकाने लेखाचा **30 मिनिटांच्या आत** स्पष्ट डिजिटल फोटो घ्यावा आणि सादर करावा निर्धारित वेळेनंतर सादर केलेल्या प्रवेशिका स्पर्धेसाठी विचारात घेतल्या जाणार नाहीत.
- स्पर्धेचे गुणांकन सर्जनशीलता, भाषा-शब्दसंग्रह आणि व्याकरण आणि लेखन शैलीच्या आधारे केले जाईल.
- कृपया कोविड 19 योग्य वर्तन मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करा.

**स्पर्धेसाठी विषय (महाविद्यालय कोणताही एक विषय निवडू शकतो)**

1. अन्न वाचवा
2. महिला सक्षमीकरणविकास
3. वाईट सामाजिक प्रथा
4. पर्यावरणाचे रक्षण
5. निवडणुकीत मतदान करण्याचा माझा अधिकार
6. कोविड 19
7. भारतीय संविधान
8. भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**उडान महोत्सवात सहभागी होण्यासाठीची पात्रता**

2021-2022 या शैक्षणिक वर्षासाठी विभागाच्या वार्षिक विस्तार कार्यउपक्रमांमध्ये नोंदणी केलेले विद्यार्थी (UG आणि PG) या स्पर्धांमध्ये सहभागी होण्यास पात्र आहेत.

**स्पर्धेसाठीचे सामान्य नियम आणि विनिमय**

- स्पर्धा केवळ आभासी (व्हर्च्युअल) पद्धतीने घेतली जाईल.
- सहभागी स्पर्धकांनी त्यांचे सादरीकरण मराठी/हिंदी किंवा इंग्रजी भाषेत सादर करावे. स्पर्धक मराठी किंवा हिंदी किंवा इंग्रजी बोलींसह अंशतः किंवा पूर्णपणे सादर करू शकतात किंवा आवश्यकतेनुसार काही भाग/संवाद मराठी किंवा हिंदी किंवा इंग्रजी बोलींमध्ये सादर करू शकतात.
- विद्यार्थ्याकडे आधार कार्ड आणि वैध ओळखपत्र किंवा बोनाफाईड प्रमाणपत्र आणि *संलग्न महाविद्यालय/मान्यताप्राप्त संस्था/केंद्र/* मुंबई विद्यापीठाचा विद्यापीठ विभाग , जिथून तो/तिची पदवी घेत आहे , त्याची फी पावती असावी. आयोजक समिती/कॉलेज/विभागाने जेव्हाही विचारणा करेल तेव्हा त्याने/तिने ते सादर करावे.
- ज्या नोंदणीकृत विद्यार्थ्यांची नावे संबंधित महाविद्यालयाने विभागाला सुपूर्त केली आहेत (परिशिष्ट III मध्ये), त्यांनाच महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करण्याची आणि स्पर्धेत भाग घेण्याची परवानगी आहे.
- पंचांचा निर्णय अंतिम राहील. कोणत्याही प्रकारचा आक्षेप / तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
- विद्यार्थ्याच्या इथे इंटरनेट कनेक्टिव्हिटी किंवा सिस्टममध्ये बिघाड झाल्यामुळे निर्माण होणारा त्रास यासाठी आयोजक जबाबदार नाहीत. त्यामुळे कृपया सादरीकरणा दरम्यान चांगली इंटरनेट कनेक्टिव्हिटी असल्याची खात्री करा.
- आयोजक सर्व महाविद्यालयांना सर्व स्पर्धांमध्ये सहभाग घेण्यास आमंत्रित करत आहेत. मात्र महाविद्यालयांनी किमान दोन स्पर्धांमध्ये सहभाग घेणे अनिवार्य आहे.
- कोणत्याही प्रकारे स्पर्धांचे व्हिडिओ चित्रीकरण करण्यास सक्त मनाई आहे. असे चित्रीकरण करताना आढळल्यास संबंधित महाविद्यालय स्पर्धेतून बाद करण्यात येईल.
- कृपया कोविड 19 योग्य वर्तन मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करा.